RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(४)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXV OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR THE CONTROL, REGULATION OR ELIMINATION OF NOISE IN THE STATE OF MAHARASHTRA AND MATTERS CONNECTED THEREWITH.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५**

**महाराष्ट्र राज्यात आवाजाचे नियंत्रण करणे, विनियमन करणे किंवा तो नाहीसा करणे आणि तत्संबंधी बाबी यांची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यामध्ये, विशेषतः महाराष्ट्रातील शहरांमध्ये सध्या अस्तित्वात असणाऱ्या नको असलेल्या ध्वनीची " यात यापुढे ज्यास आवाज म्हटले आहे " पातळी, वारंवार अवधी आणि तीव्रता व स्वरूप यांनी एक अशी पातळी गाठली आहे की, ज्यामुळे तो ध्वनी नागरिकांचे आरोग्य, सुरक्षितता व मानसिक स्वास्थ्य यांना बाधक ठरतो ;

**आणि ज्याअर्थी,** नको असलेला ध्वनी ( आवाज ) निर्माण करणारी यंत्रे व कळयंत्रे ( गॅजिट् ) यांची संख्या अतिशय वेगाने वाढत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** आवाजाच्या प्रदूषणाचे परिणाम, वारंवारता आणि महाराष्ट्र राज्यातील नागरिकांच्या शरीरावर व मनावर होणारे त्यांचे दुष्परिणाम यांपासूनच्या धोक्याची जाणीव व परिस्थितीशास्त्र तज्ज्ञांना अधिकाधिक तीव्रतेने झालेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** आवाजाच्या प्रदूषणास ताबडतोब आळा घातला नाही तर, त्याच्या परिणामी नागरिकांच्या स्वास्थ्याचे भरून न येणारे व नाहीसे करता न येणारे असे नुकसान होईल.

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.

**१.** ( १ ) या अधिनियमास, महाराष्ट्र आवाज प्रदूषण प्रतिबंधक अधिनियम, २०२५ असे म्हणता येईल.

( २ ) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

( ३ ) तो महाराष्ट्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील, अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

( अ ) " प्राधिकरण " म्हणजे, कलम ४ अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र आवाज नियंत्रण प्राधिकरण ;

( ब ) " मुख्य कार्यकारी अधिकारी " म्हणजे, महाराष्ट्र शासनाने नेमलेला व तसे संबोधित केलेला कोणताही अधिकारी आणि त्यामध्ये, राज्य शासनाने ज्याला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कामे पार पाडण्यास सांगितले असेल, अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचा देखील समावेश होईल ;

( क ) " आवाज " म्हणजे ध्वनीच्या सभोवतालच्या परिस्थितीच्या संदर्भात व सर्वसाधारण शरीरयष्टी आणि संवेदनक्षमता असणाऱ्या व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक स्वस्थ्यावर होणाऱ्या त्या ध्वनीच्या परिणामांच्या संदर्भात, ध्वनीचे स्वरूप, वारंवारता, तीव्रता आणि अवधी विचारात घेता, नकोसा ठरणारा आवाज, ध्वनीचे किंवा आवाजाचे साधन म्हणजे कोणतीही यंत्ररचना आणि उपयंत्र किंवा यंत्रक ( कंट्राव्हन्स ), ज्यामुळे आवाज निर्माण होतो, अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी उत्पादित केलेली वस्तू, कोणतीही प्रक्रिया किंवा कोणतेही कार्य या गोष्टींचा ध्वनीच्या किंवा आवाजाच्या साधानामध्ये समावेश होतो. तसेच त्यामध्ये, कोणत्याही व्यक्तीच्या मालकीच्या जागेमध्ये होणाऱ्या आवाजाचा समावेश आहे मग तो बाहेर ऐकू येत असो अथवा नसो त्याचप्रमाणे त्यामध्ये, मोटार-सायकली, भोंगे, आगगाड्या आणि इतर सर्व प्रकारची वाहने, रेडिओ, दूरचित्रवाणी, ध्वनीक्षेपक आणि तत्सम गोष्टी यांचा देखील समावेश असेल ;

( ड ) " विहित " म्हणजे, अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले.

प्राधिकरणाची स्थापना

**३.** राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र आवाज नियंत्रण प्राधिकरण या नावाच्या प्राधिकरणाची स्थापना करील व मुख्य कार्यकारी अधिकारी हा त्याचा प्रशासकीय प्रमुख असेल. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, तो वेळोवेळी ठरवील इतक्या उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे सहाय्य मिळेल.

**४.** प्राधिकरण पुढील सदस्यांचे मिळून असेल :— प्राधिकरणाची रचना

( अ ) पदसिद्ध सदस्य —

( १ ) नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य ;

( २ ) महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका ;

( ३ ) पर्यावरण संरक्षण अभिकरणाचे सर्व सदस्य ;

( ४ ) प्राचार्य, व्हिक्टोरिया ज्युबिली तंत्र संस्था, मुंबई ;

( ५ ) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य ;

( ६ ) मुंबई विद्यापीठाच्या जीवशास्त्र, गानसशास्व आणि भौतिकशास्त्र या विभागाचे प्रमुख ;

( ७ ) प्राचार्य, विज्ञानसंस्था, मुंबई ;

( ८ ) नगर अभियंता, मुंबई महानगरपालिका ;

( ९ ) सचिव, कामगार मंत्रालय, भारत सरकार ;

( १० ) अध्यक्ष, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, भारत सरकार :

( ११ ) संचालक, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती.

( ब ) नामनिर्देशित सदस्य —

राज्याचे प्रतिनिधित्व करणारे संसद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळाचे सदस्य आणि राज्यातील महानगरपालिकांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य यामधून राज्य शासन निवड करील, असे कोणतेही तीन सदस्य.

**५.** प्राधिकरणाचे कामकाज चालविण्यासाठी राज्य शासनास वेळोवेळी नियम तयार करता येतील. राज्य शासनास, प्राधिकरणाच्या सदस्याला मानधन किंवा असे इतर भत्ते देण्यासाठी देखील नियम तयार करता येतील. प्राधिकरणाचे कामकाज चालविण्यासाठी आणि प्राधिकरणाच्या सदस्यांना मानधन देण्यासाठी शासनाने नियम तयार करणे.

**६.** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला दुय्यम असेल असा, प्राधिकरणाचा एक पूर्णकालिक सचिव असेल, व तो भौतिकशास्त्र किंवा जीवशास्त्र किंवा अभियांत्रिकी किंवा संबद्ध विज्ञान यांपैकी एका विज्ञान शाखेचा स्नातक असेल. प्राधिकरणाचा सचिव.

**७.** ( १ ) प्राधिकरणाला, त्याला विचारविनिमय करणे योग्य वाटेल अशा तज्ज्ञांचा सल्ला वेळोवेळी घेता येईल. ते महाराष्ट्र राज्यातील आवाजाच्या साधनांबाबत आणि आवाजाचा प्रतिबंध करणे, त्याचे विनियमन करणे, त्याचे नियंत्रण करणे किंवा तो नाहीसा करणे याबाबतच्या उपाययोजनांबाबत संशोधन करील. प्राधिकरणाने तज्ज्ञांचा सल्ला घेणे.

( २ ) तसेच, प्राधिकरण राज्यातील नागरिकांना आणि शिक्षणतज्ज्ञांना आवाज प्रदूषणावरील शिक्षण देण्यासाठी सर्व उपाय योजील. या प्रयोजनासाठी प्राधिकरणामध्ये वृत्तपत्रव्यवसाय किंवा रेडिओ किंवा

दूरचित्रवाणी किंवा जाहिराती किंवा जनसंपर्काची इतर कोणतीही माध्यमे यामधील किमान पाच वर्षांचा अनुभव असलेला एक जनसंपर्क अधिकारी असेल.

सचिव आणि कर्मचारीवर्गातील यांचे वेतन व सेवाशर्ती.

**८.** राज्य **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे सचिव, जनसंपर्क अधिकारी व प्राधिकरणाचा इतर कर्मचारीवर्ग यांच्या सेवाशर्ती आणि वेतन, विहित करील.

प्राधिकरणाने ध्वनीचे विनियमन करणे.

**९.** (१) प्राधिकरण, कोणत्या साधनाद्वारे, अनुज्ञेय प्रमाणात होणाऱ्या आवाजाच्या संबंधात मग तो कोणताही असो-आदर्श नियम किंवा विनियम विहित करील. जर कोणत्याही वेळी, आवाजाच्या कोणत्याही साधनांच्या संबंधात त्या साधनांची निर्मिती करणाऱ्या, त्याचा व्यापार करणाऱ्या किंवा त्याचा वापर किंवा साठा करणाऱ्या किंवा अन्य प्रकारे त्याचा प्रभारी असणाऱ्या किंवा त्याचे नियंत्रण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अनुज्ञेय आवाजासंबंधातील आदर्श नियम किंवा विनियम यांचे उल्लंघन केले आहे, असे मानण्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास संयुक्तिक कारण असेल, तर तो अशा व्यक्तीला योग्य तो लेखी निदेश देईल. असे निदेश मिळाल्यानंतर अशा व्यक्तीने या निदेशाचे पालन करण्यास कसूर केली तर मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतः किंवा त्याच्या अधिकाऱ्यामार्फत आवाजाला प्रतिबंध करण्यासाठी, त्याचे विनियमन करण्यासाठी, नियंत्रण करण्यासाठी किंवा तो नाहीसा करण्यासाठी परिस्थितीनुसार आवश्यक असतील असे योग्य ते उपाय योजील.

(२) महाराष्ट्र राज्यात आवाजावर नियंत्रण ठेवणे, त्याचे विनियमन करणे त्याला प्रतिबंध करणे किंवा तो नाहीसा करणे हे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे आणि प्राधिकरणाच्या सर्व पदधारकांचे आणि सदस्यांचे कर्तव्य असेल.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने निर्मितीसाठी नियम व विनियम विहित करणे.

**१०.** मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरणाच्या सदस्यांशी किंवा त्याला निवडता येतील अशा तज्ज्ञांशी विचारविनिमय करून, ज्या उत्पादनामुळे आवाज निर्माण होण्याची शक्यता आहे अशा उत्पादनांच्या निर्मितीसाठी विनियम विहित करील. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अशा उत्पादनांच्या निर्मितीसाठी संकल्पचित्रेसुद्धा विहित करील. त्यासाठी आवश्यक वाटेल तर त्याला भारतीय मानक संस्थेशी विचारविनिमय करता येईल. तथापि, भारतीय मानक संस्थेचे मत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर बंधनकारक असणार नाही.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने आवाजाला प्रतिबंध करण्यासाठी त्याचे विनियमन करण्यासाठी किंवा तो नाहीसा करण्यासाठी निदेश देणे.

**११.** कोणतेही उत्पादन, कळयंत्र किंवा यंत्ररचना यांच्यापासून होणाऱ्या आवाजाला प्रतिबंध करण्यासाठी, त्याचे नियंत्रण करण्यासाठी, त्याचे विनियमन करण्यासाठी किंवा तो नाहीसा करण्यासाठी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला त्या उत्पादनाचा, कळयंत्राचा किंवा यंत्ररचनेचा वापर करणाऱ्या व्यक्तीला लेखी किंवा तोंडी निदेश देता येतील. अशा निदेशांचे पालन करण्यात कसूर करणे हा अपराध ठरेल.

व्यक्तीच्या शारीरीक आणि मानसिक सुस्थितीला हानिकारक असल्याचे गृहित धरण्यात आलेला आवाज या अधिनियमा खालील अपराधांची दखल घेणे.

**१२.** प्रत्येक आवाज हा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या शारीरिक आणि मानसिक सुस्थितीला हानिकारक आहे असे गृहित धरण्यात येईल. एखादा आवाज व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या शारीरिक किंवा मानसिक सुस्थितीला हानिकारक नाही हे सिद्ध करण्याचा भार जी व्यक्ती स्वतः किंवा इतरांमार्फत आवाज निर्माण करणारी आहे किंवा जिला, जिच्यामुळे आवाज निर्माण होतो अशी कोणतीही प्रक्रिया किंवा व्यापार किंवा कृती किंवा इतर कोणतीही आजीविका हिच्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे लाभ होतो किंवा जी स्वतः इतरांमार्फत आवाजाच्या साधनाचा वापर करते किंवा त्याच्याशी संबंधित आहे अशा व्यक्तीवर असेल.

**१३.** या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध हा, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा सचिव किंवा सदस्य किंवा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरणाच्या कर्मचारीवर्गातील व्यक्ती यांच्या केवळ सांगण्यावरून दखलपात्र असेल. असे अपराध दखलपात्र आणि किमान सातशे रुपये इतकी जमानत घेण्यायोग्य असतील. या अधिनियमाखालील सर्व खटले महानगर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात किंवा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ यामध्ये देण्यात आल्याप्रमाणे त्याच्याशी समतुल्य असेल अशा न्यायालयात दाखल करण्यात येतील. न्यायालय, या अधिनियमाखालील प्रकरणांवर कार्यवाही करताना, आवश्यक असेल तर, तज्ज्ञांचे मत घेईल.

**१४.** जी कोणतीही व्यक्ती, प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही विनियमांचा, मानकांचा, कसोटींचा निदेशांचा आदेशांचा जाणूनबुजून किंवा अन्यथा भंग केल्याबद्दल दोषी असेल तिला, एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल, परंतु शंभर रुपयांपेक्षा कमी नसेल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि तसेच दंडाधिकाऱ्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशी. साध्या किंवा सक्षम कारावासाची शिक्षाही या व्यक्तीला होईल, तसेच न्यायालयाला, त्याच्या स्वेच्छा निर्णयानुसार, प्रकरण जिंकणाऱ्या फिर्यादीला पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढा वादाचा खर्च प्रदान करता येईल.

विनियम इत्यादींच्या भंगाबद्दल शास्ती

**१५.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला कॉमनव लॉ अन्वये किंवा लॉ ऑफ टॉर्टस् अन्वये, आवाजमुक्त असे कोणतेही वातावरण ठेवण्याच्या तिच्या त्याच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्याचा जो कोणताही अधिकार असेल तो निर्बंधित होणार नाही. प्रत्येक आवाजामुळे व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या एकांताच्या अधिकाराचा भंग होतो असे मानण्यात येईल.

कॉमन लॉ, लॉ ऑफ टॉर्टस् इत्यादी अन्वयेचे व्यक्तीचे अधिकार, अधिनियमाच्या उपबंधनामुळे निर्बंधित न होणे.

**१६.** प्राधिकरणास या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये विहित किंवा उपबंधित करावयाच्या किंवा करण्यात येतील अशा सर्व किंवा कोणत्याही गोष्टी पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी व खालील केलेल्या नियमांशी सुसंगत असे विनियम तयार करता येतील.

विनियम तयार करण्याचा अधिकार.

**१७.** प्राधिकरणाचे सर्व अधिकारी व सर्व कर्मचारीवर्ग, भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम २ (२८) आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९४७ याच्या अर्थकक्षेत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारीवर्ग लोकसेवक असणे.

**१८.** या अधिनियमाचे हेतू व उद्दिष्टे पार पाडण्यासाठी प्राधिकरणाने तयार केलेले सर्व विनियम, कसोट्या व चाचण्या हे निदेश आणि आदेश वगळून, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येतील आणि ते ज्या अधिवेशनात मांडण्यात आले त्या अधिवेशनात किंवा त्यानंतर लगेचच्या अधिवेशनात विधानमंडळाकडून करण्यात येतील आणि **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील अशा बदलास अधीन असतील.

विनियम इत्यादी राज्य विधानमंडळापुढे मांडणे.

**१९.** प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, सचिव आणि सर्व अधिकारी यांचे आदेश, निदेश किंवा संपादन यांचे पालन करणे हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे आणि इतर प्रत्येक लोकसेवकाचे कर्तव्य असेल.

पोलीस प्राधिकरणे, इत्यादींनी प्राधिकरणाचे आदेश पाळणे.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

आवाज म्हणजे नको असलेला ध्वनी, आपल्या शहरातून आणि गावातूनही अशा नको असलेल्या ध्वनीचे परिणाम, विस्तार, स्वरूप, तीव्रता आणि बारंवारता इतकी वाढली आहे की, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. काही बाबतीत, शेजाऱ्याच्या रेडिओच्या आवाजामुळे खुनासारख्याही प्रतिक्रिया झालेल्या आहेत. आवाजाची साधने पुढीलप्रमाणे नानाविध आहेत-कारखाने, यंत्रे, ट्रान्झिस्टर्स, रेडिओ, दूरचित्रवाणी, बसेस, मालमोटारी, मोटारी, स्कूटर्स, टेम्पो, विमाने इत्यादी तंत्रशास्त्राच्या प्रगतीबरोबरच या साधनांचीही वाढ होत आहे. तथापि, आज जनतेला अनियोजित तंत्रशास्त्रीय प्रगतीच्या परिणामांना तोंड द्यावे लागत आहे. दूरचित्रवाणी, रेडिओ, ट्रान्झिस्टर इत्यादींपासून नको असलेल्या ध्वनीमुळे आपल्या एकांततेवर आक्रमण होते.

आवाज होत असताना, अभ्यास करणे हे विद्यार्थ्यांना तापदायक होते. सार्वजनिक आणि खाजगी रुग्णालयातील रोग्यांना आवाजामुळे अत्यंत त्रास होतो. अभ्यास, काम, विश्रांती आणि चिंतन यासाठी शांततेची नितांत आवश्यकता आहे. आता आरोग्यासाठी आवश्यक म्हणून स्वीकृत केलेला योगाभ्यासही आवाज होत असताना करणे शक्य नाही. कामाचे स्वरूप कोणतेही असले तरी नको असलेला ध्वनी जेथे आहे अशा ठिकाणी ते काम करणे शक्य नाही.

आपल्या देशात या आवाजाच्या समस्येचा कोणताही पद्धतशीर, वैज्ञानिक आणि पुरेसा असा अभ्यास केला गेलेला नाही किंवा ही समस्या हाताळण्यासाठी पुरेसे अधिकार असणारी अशी एकही एजन्सी नाही. तसेच, आवाज नाहीसा करण्याचे शिक्षण जनतेला देण्याची गरज आहे. औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीचा बळी देऊन, ही उद्दिष्टे साध्य करणे शक्य नाही. म्हणून हे गुंतागुंतीचे तांत्रिक घटक विचारात घेणाऱ्या एखाद्या संस्थेची आवश्यकता आहे. अशी संस्था निर्माण करणे हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे. नको असलेला आवाज कमी करण्यासाठी व्यापक कायदा तयार करणे आणि आवाज कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात एखादी कायम स्वरूपाची शक्तीशाली आणि परिणामकारक यंत्रणा निर्माण करणे, हा विधेयकाचा हेतू आहे. ज्यामुळे नागरिकांचे शारीरिक आरोग्य सुस्थितीत राहील आणि आध्यात्मिक प्रगती होईल असे वातावरण निर्माण करणे हेच या विधेयकाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

म्हणून, हे विधेयक सादर करण्यात येत आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०५ मे,२०२५

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(३)** – या खंडान्वये, उक्त अधिनियम, ज्या दिनांकास अंमलात येईल तो दिनांक **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३** – या खंडान्वये महाराष्ट्र आवाज नियंत्रण प्राधिकरण स्थापना करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५** – या खंडान्वये प्राधिकरणाचे कामकाज चालविण्यासाठी वेळोवेळी नियम तयार करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८** – या खंडान्वये प्राधिकरणाचा सचिव तसेच जनसंपर्क अधिकारी तसेच प्राधिकरणाचा इतर कर्मचारी वर्ग यांचे वेतन व सेवाशर्ती ठरविण्याचा अधिकार राज्यशासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १८** – या खंडान्वये प्राधिकरणाने तयार केलेले विनियम विधानमंडळापुढे ठेवण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**वैधानिक अधिकार सोपविल्यासंबंधीचे उपरोल्लेखित प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.**

## वित्तीय ज्ञापन

खंड ८ अन्वये महाराष्ट्र आवाज नियंत्रण प्राधिकरणाचा सचिव तसेच जनसंपर्क अधिकारी तसेच प्राधिकरणाचा इतर कर्मचारी वर्ग यांना राज्य शासन विहित करेल असे वेतन देण्यात येईल.

महाराष्ट्र आवाज नियंत्रण प्राधिकरण निर्माण करण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीमधून विवक्षित अनावर्ती खर्च करावा लागेल तसेच प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या वेतनासाठी राज्याच्या एकत्रित निधी मधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.